**२१ ऑक्टोबरला पोलीस स्मृतिदिनाचे पालन**

पणजी: ऑक्टोबर १९, २०१९

अश्विन २७, १९४१

२१ ऑक्टोबर रोजी, पणजी येथील गोवा पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर, वार्षिक पोलीस स्मृतिदिन परेड २०१९सहित, ६१वा पोलीस स्मृतिदिन पाळला जाईल.

१९५९ मध्ये चिन्यांनी केलेल्या छुप्या हल्ल्यात मारल्या गेलेल्या सीआरपीएफ जवानांच्या स्मरणार्थ, दर वर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणून पाळला जातो.

पोलीस महासंचालक श्री. प्रणब नंदा, आयपीएस हे श्रद्धांजली अर्पण करतील आणि १ सप्टेंबर २०१८ पासून ३१ ऑगस्ट २०१९ पर्यंतच्या काळात, देशातील ज्या २९२ पोलिसांनी सेवेतील आपले कर्तव्यपालन करताना प्राणांचे बलिदान दिले, त्यांची नावे वाचून दाखवतील. त्यानंतर पोलीस हुतात्म्यांच्या स्मरणार्थ, “रिव्हर्स आर्म्स” होईल.

स्मरणार्थ परेडनंतर, कामावर उपस्थित असताना आणि शत्रूंशी दोन हात करताना प्राण गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या स्मरणार्थ, डीजीपी व इतर पोलीस अधिकारी हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करतील.

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी, चीनने लडाखमधील भारतीय पोलीस पोस्टवर अतिक्रमण करून त्याच्यावर ताबा घेतला. यादरम्यान १० पोलीस कर्मचाऱ्यांनी देशासाठी प्राणत्याग केला. या पोलीस हुतात्म्यांच्या स्मरणार्थ, केंद्र सरकारने दर वर्षी देशभर “स्मृतिदिन” पाळण्याचे ठरवले.

गोव्यातील हुतात्मे स्व. श्री. बलराम बी. शिंदे आणि स्व. श्री अभिषेक गोमजे यांच्या कुटुंबियांना या समारंभाचे आमंत्रण दिले गेले आहे.

पोलीस स्मृतिदिनाच्या प्रसंगी, पोलीस महासंचालक श्री. प्रणब नंदा यांनी गोवा राज्यातील सर्व नागरिकांना देशसेवेतील भारतीय पोलिसांच्या संकेतस्थळाला www.police.gov.in येथे भेट देण्याचे आवाहन केले आहे. हे संकेतस्थळ कर्तव्यपालनार्थ पोलीस कर्मचाऱ्यांनी केलेले सर्वोच्च त्याग अधोरेखित करण्यासाठी, माननीय प्रधानमंत्र्यांनी डिसेंबर २०१५ मध्ये सुरू केले होते.

डीआय/एनबी/पीएन/पीपी/आरएलएम/२०१९/८९३